Title of Programme: **फिरते ग्रंथालय कार्यक्रम**

Name of Organizing Department : **मराठी विभाग**

Name of the Coordinator of the Programme: **डॉ. संजय शिंदे**

Date of the Programme : २०/८/२०२६

Venue: **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

Target Group : **सर्व विद्यार्थी**

Number of Participants: २४००

Name of Resource Person : **संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील साहेब**

Total Expenditure for the Programme: - १७०० /-

Source of Funding: - **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**Report: फिरते ग्रंथालय कार्यक्रमाचा अहवाल**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, पुस्तकांशी त्यांचा प्रत्यक्ष परिचय व्हावा आणि मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीच्या समृद्ध परंपरेचा परिचय नव्या पिढीला करून देण्याच्या उद्देशाने पुणे पुस्तक महोत्सव, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आणि राष्ट्रीय पुस्तक न्यास, केंद्रीय शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्या सौजन्याने फिरते ग्रंथालय हा उपक्रम राबविण्यात आला.

पुस्तकांनी आकर्षक पद्धतीने सजविलेल्या गाडीतील या फिरत्या ग्रंथालयाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले. विविध विषयांवरील पुस्तके विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी पाहता व अनुभवता आल्याने या उपक्रमामुळे महाविद्यालयात वाचनविषयक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. विठ्ठल दौंडकर आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी महाराष्ट्राला समृद्ध अशी शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरा लाभली असल्याचे सांगितले. पुस्तक वाचनाच्या माध्यमातून ही समृद्ध परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी फिरत्या ग्रंथालयाचा जास्तीत जास्त लाभ घेऊन पुस्तके वाचावीत आणि त्या माध्यमातून आपले जीवन घडवावे, असे आवाहन त्यांनी केले. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा प्रसार करणारा हा उपक्रम निश्चितच विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या उपक्रमाच्या निमित्ताने जानेवारी महिन्यात पुणे येथे होणाऱ्या १००व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे निमंत्रण संस्थेला व महाविद्यालयाला देण्यात आले. त्यामुळे या उपक्रमाला वाचनाबरोबरच मराठी साहित्य आणि सांस्कृतिक चळवळीशी जोडणारा विशेष संदर्भ प्राप्त झाला.

HRM

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले. विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याने फिरते ग्रंथालय स्वागताचा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.




फिरते ग्रंथालय उपक्रमाचे स्वागत करताना मान्यवर

पुण्य नगरी

# फिरत्या ग्रंथालयाचे राजगुरु महाविद्यालयात स्वागत

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

पुणे पुस्तक महोत्सव, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे तसेच राष्ट्रीय पुस्तक न्यास आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आलेल्या फिरत्या ग्रंथालयाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.




यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. गोपाळ अलापुरे, डॉ. पायल ओसवाल, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे आणि डॉ. विठ्ठल दौंडकर, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे सुरेश कुमार, धर्मपाल सिंग, मनोज कुमार, सतीश कुमार, हरिभाऊ आव्हाड

यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन ज्ञानाची व्याप्ती वाढण्यास अशा उपक्रमांचा मोठा हातभार लागेल, असा विश्वास बुट्टे पाटील यांनी व्यक्त केला.

दरम्यान, डिसेंबरमधील पुस्तक महोत्सव व जानेवारी महिन्यात पुणे येथे होणाऱ्या १००व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे निमंत्रणही संस्थेला व महाविद्यालयाला देण्यात आले. विद्यार्थ्यांनी पुस्तकांनी सजलेल्या फिरत्या ग्रंथालयाची पाहणी करून विविध विषयांवरील पुस्तकांची माहिती घेतली. वाचनसंस्कृतीला चालना देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले. आदित्य बोरसे, दिव्या पिंगळे, ज्ञानदा कड, ओम जाधव, अभिषेक कोरडे या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

Pimpri Chinchwad Edition
Aug 22, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com